आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

१३ सप्टेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या संकेतस्थळाचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण
- मुंबईत डबेवाले आणि गटई कामगारांसाठी १२ हजार घरकुलं उभारण्याच्या करारावर स्वाक्षऱ्या
- केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या जनसुनवाई पोर्टलचं पीयूष गोयल यांच्या हस्ते अनावरण
- अंदमान निकोबारमधल्या पोर्ट ब्लेअरचं नामांतर श्री विजय पुरम होणार

**आणि**

- लोकसभतले विरोधीपक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या आरक्षणा संदर्भातल्या कथित वक्तव्या विरोधात आज भाजपातर्फे राज्यात विविध ठिकाणी आंदोलन

<><><><>

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या संकेतस्थळाचं लोकार्पण आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत झालं. आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असं फडणवीस यांनी यावेळी नमूद केलं. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचं आणि भित्तीपत्रकाचं प्रकाशनही फडणवीस यांच्या हस्ते यावेळी झालं. काही लाभार्थी शेतकऱ्यांशी फडणवीस यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. या योजनेत गेल्या सहा महिन्यात दोन लाख शेतकऱ्यांची निवड झाली असून त्यापैकी ४५ हजार शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषिपंप बसवण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><>

डबेवाले तसंच गटई कामगारांसाठी मुंबईत परवडणाऱ्या दरात घरांची निर्मिती केली जाणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतून बारा हजार घरे बांधली जाणार असून म्हाडाच्या माध्यमातून मंजूर केली जाणार आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सह्याद्री अतिथीगृहात मुंबई डब्बेवाला, चर्मकार संघटना आणि प्रियंका होम्स रियल्टी यांच्यात यासाठीचा सामंजस्य करार करण्यात आला.

<><><><>

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र असणाऱ्या सर्व जेष्ठ नागरिकांना एक नवीन विशेष कार्ड दिलं जाणार आहे. आधार कार्डावरच्या जन्मतारखेनुसार ७० वर्ष आणि त्याहून अधिक वयाचे नागरिक या योजनेत अर्ज दाखल करण्यास पात्र असतील. ही योजना एका आठवड्यात सुरु होईल अशी अपेक्षा असून यासाठी पात्र व्यक्तींनी संकेतस्थळावर अर्ज भरणं आवश्यक आहे.

<><><><>

राज्यातल्या ४३४ शासकीय प्रशिक्षण संस्थेमध्ये संविधान मंदिराची उभारणी करण्यात आली आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते दूरदृष्य संवाद यंत्रणेच्या माध्यमातून परवा १५ सप्टेंबरला उद्घाटन करण्यात येणार आहे. १२ ते १५ तारखेदरम्यान

संविधान महोत्सव साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने नांदेड, परभणी सह विविध ठिकाणच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून संविधानावर आधारित विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

<><><><>

चौथ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाला उद्यापासून आरंभ होत असून नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित या हीरक महोत्सवी विशेष सोहळ्याचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी एक विशेष टपाल तिकिट आणि नाणं प्रकाशित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात केंद्रीय गृह मंत्रालयाअंतर्गत असलेल्या राजभाषा विभागांतर्गत भारतीय भाषा विभागाचं उद्घाटन तसंच अनेक पुस्तकं आणि मासिकांचं प्रकाशन करण्यात येणार आहे.

केंद्रीय गृहमंत्र्यांचा राजभाषा दिनानिमित्तचा विशेष संदेश उद्या सकाळी सात वाजून दहा मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित करण्यात येणार आहे. त्यामुळे यावेळी दररोज पुणे केंद्रावरुन प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या सकाळी पावणेसात ते सहा वाजून ५५ मिनिटं या वेळेत प्रसारित होईल.

<><><><>

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आज मुंबईत आले होते. त्यांनी विविध ठिकाणच्या गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांना भेट देऊन दर्शन घेतलं. उपनगरीय रेल्वेतून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते विक्रोळी असा प्रवास त्यांनी केला. मुंबईत रेल्वेच्या पायाभूत सुविधांच्या अद्ययावतीकरणासाठी आगामी काळात प्रस्तावित असलेल्या १२ महत्त्वाच्या प्रकल्पांची चर्चा त्यांनी या प्रवासादरम्यान केली.

<><><><>

गणेशोत्सवासाठी कोकणात गेलेले मुंबईकर आता परतीच्या वाटेला लागले आहेत. त्यामुळे माणगाव, इंदापूरसह मुंबई-गोवा महामार्गावरच्या अनेक शहरांमध्ये वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचं पाहायला मिळत आहे, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पाच दिवसांच्या गौरी-गणपतीचं विसर्जन झाल्यानंतर चाकरमानी कामावर रुजू होण्यासाठी मुंबईला परतत आहेत. त्यामुळे अनेक शहरात पुन्हा एकदा मोठी वाहतूक कोंडी पहायला मिळत आहे.

<><><><>

श्रोते हो, विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीनं साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेत आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यामध्ये आज आपण जाणून घेणार आहोत, ब्रिटनमधल्या गणेशोत्सवाविषयी.

<><><><>

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या जनसुनवाई पोर्टलच अनावरण पीयूष गोयल यांनी आज मुंबईत केलं. व्यापार आणि उद्योग क्षेत्रातल्या व्यावसायिकांना याद्वारे प्रशासनासोबत थेट आणि पारदर्शकरित्या संवाद साधता येणार आहे. चहा, कॉफी, मसाले, रबर महामंडळ, अपेडा, परदेश व्यापार महासंचलनालय यांच्यासारख्या मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या विभागांचा यात समावेश आहे. ECGC च्या सुधारित SMILE-ERP सुविधेचं लोकार्पणही त्यांनी केलं. जनसुनवाणी पोर्टलच्या माध्यमातून निर्यातदारांना त्यांच्या समस्या घरबसल्या सोडवता येणार आहेत. व्यापार मंडळाच्या सदस्यांची बैठकही त्यांनी घेतली. १० राज्यांचे मंत्री या बैठकीला उपस्थित होते. यावेळी गुजरात, उत्तर प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू यासारख्या राज्यांनी निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी घेतलेल्या उपाय योजनांवर चर्चा झाली.

<><><><>

अंदमान आणि निकोबार मधल्या पोर्ट ब्लेअरचं नामकरण श्री विजय पुरम असं करण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे. देशाच्या इतिहासात विशेषतः

स्वातंत्र्यचळवळीत या ठिकाणाचं महत्त्व अनन्यसाधारण असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. ऐतिहासिक चोल साम्राज्याचा नौदल तळ तिथं होता आणि आजही या जागेचं विकासात्मक आणि धोरणात्मक महत्त्व टिकून आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठीच्या लढ्यातले स्वातंत्र्यवीर सावरकरांसारखे अनेक सेनानी इथं बंदिवासात होते, तसंच नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सरकारचा ध्वज भारतीय भूमीवर प्रथम इथंच फडकावला, अशी माहिती शहा यांनी दिली आहे.

<><><><>

लोकसभतले विरोधीपक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहूल गांधी यांच्या आरक्षणा संदर्भातल्या कथित वक्तव्या विरोधात आज भाजपातर्फे राज्यात विविध ठिकाणी आंदोलन करण्यात आलं.

**हिंगोली**चे आमदार तानाजी मुटकुळे , माजी आमदार गजानन घुगे यांच्या नेतृत्त्वाखाली डॉ बाबसाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ निषेध आंदोलन करण्यात आलं.

**नंदूरबार** जिल्ह्यात नगरपालिका चौकात माजी खासदार डॉ हिना गावित यांच्या नेतृत्त्वाखाली राहूल गांधी यांच्या विरोधात निदर्शनं करण्यात आली. या वेळी भाजपाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

**पालघर** जिल्ह्यात विक्रमगड इथं भाजपा खासदार हेमंत सावरा यांच्या नेतृत्त्वाखाली कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी हातात फलक घेऊन राहूल गांधी यांच्या विरुद्ध घोषणाबाजी केली. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही राहूल गांधी यांच्या कथित वक्तव्याचा निषेध केला आहे. दलित, आदीवासी यांचं आरक्षण कोणीच हिरावून घेऊ शकत नाही, असंही ते म्हणाले.

<><><><>

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालय आणि बौद्ध महासंघाने संयुक्तरित्या उद्या मुंबई इथे भविष्यातील जागतिक नेतृत्वाला मार्गदर्शन करण्यासाठी बुद्धाचा मध्यम मार्ग या विषयावर एक दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. वरळी इथल्या नेहरू विज्ञान केंद्रात ही परिषद होणार असून केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजीजू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. आधुनिक काळात बौद्ध धम्माची भूमिका आणि प्रासंगिकता, मानवी मनातील जाणीवांशी संबंधित तंत्राचे महत्त्व आणि नव्या युगाचे नेतृत्व आणि बौद्ध धम्माची अंमलबजावणी अशा तीन विषयांवरच्या चर्चासत्रांचा या परिषदेत समावेश असेल.

<><><><>

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उद्या सकाळी धाराशीव जिल्ह्यातल्या परंडा इथं महिला सशक्तिकरण अभियानाचं उद्घाटन करणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस अजित पवार उपस्थित राहणार आहेत. यावेळी जिल्हयातल्या १० यशस्वी महिलांचा सत्कार केला जाणार आहे.तसंच विविध विभागाअंतर्गत ९ महिलांना प्रातिनिधिक स्वरुपात विविध योजनांचं वाटप केलं जाणार आहे.

<><><><>

सिंधुदुर्ग जिल्हयातल्या राजकोट पुतळा दुर्घटना प्रकरणी संशयित आरोपी जयदीप आपटे याच्या पोलीस कोठडीची मुदत संपल्याने त्याला आज मालवण न्यायालत हजर करण्यात आलं. न्यायालयाने त्याला २४ सप्टेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी दिली आहे. दुसरा संशयित चेतन पाटील याला यापूर्वीच न्यायालयाने १९ सप्टेंबर पर्यंत कोठडी दिली आहे.

<><><><>

राज्यात गेल्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस झाला. येत्या २४ तासात, कोकणात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडेल, असं वेधशाळेनं कळवलं आहे.

//<><><><>//